दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक १७ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.७ नोव्हेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro, Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

### जतमध्ये पुढची पिढी दुष्काळ पाहणार नाही

## गोपीचंद पडळकरांना आशिर्वाद द्या, ५ वर्षांत जत तालुका एक नंबरवर नेऊ-देवेंद्र फडणवीस



**सांगली (वृत्तसंस्था)**–लोकांकरता जत मतदारसंघ शेवटचा असेल पण माझ्यासाठी पहिला आहे. कारण माझा गोपीचंद पडळकर या मतदारसंघातून लढत आहे. आणि म्हणून मी तुम्हाला सांगतो, की गोपीचंद पडळकरांना मतदान केले तर येत्या ५ वर्षांत हा मतदारसंघ १ नंबरवर घेऊन जाऊ, असे भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते पडळकरांसाठीच्या प्रचार सभेत बोलत होते.

देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, एका काँग्रेस नेत्याने म्हटले की जर जत मतदारसंघात पाणी पोहचले तर माझ्या कारखान्यासाठी ऊस तोड कामगार कुठून भेटतील, त्यामुळे इथे पाणी देऊ नका. जतमधला माणूस गुलाम, विस्थापित रहावा म्हणून काही मुठभर प्रस्तापितांनी या भागाचा विकास होऊ दिला नाही.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, २०१४ साली मुख्यमंत्री झालो २०२२ मध्ये पाटबंधारे विभाग मिळाला या साडेसात वर्षांमध्ये अनेक कामे केली. तुमच्या पिढीने दुष्काळ पाहिला असेल मात्र आता पुढची पिढी दुष्काळ पाहणार नाही. जतची दुष्काळी तालुका दुष्काळी गावे ही ओळख आपण कायमची पुसून टाकणार आहोत. शेतकऱ्यांना २४ तास वीज देता येईल ही तजबीज आम्ही केली आहे. दुष्काळी तालुका, दुष्काळी गाव ही ओळख पुसून टाकणार. युती सरकारच्या काळात १९९५ ते ९९ योजना सुरु केल्या. त्यानंतर २०१४ पर्यंत योजना कुलुपबंद होत्या. त्या मी पुन्हा सुरु केल्या.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अनेक समाजाकडे सरकारचे दुर्लक्ष होत होते, त्या समाजासाठी महामंडळ स्थापन करत वंचित घटकांनासोबत घेऊन आम्ही महाराष्ट्राचा विकास करणार आहोत. गोपीचंद पडळकरांनी एमआयडीसी मंजूर करून घेतली, उद्योग देण्याची जबाबदारी माझी आहे. माझ्या गोपीचंदला विजयी करत विधानसभेत पाठवा, उद्योगाचे पत्र देतच जतला पुन्हा पाठवतो. देशातील ५२ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आणली. लाडकी बहिण योजना आम्ही महाराष्ट्रात आणताच काँग्रेसवाले लोकं कोर्टात गेले, आणि योजना बंद करण्याची मागणी केली. ते तुमचे सावत्र भाऊ आहेत.

### अमोल कोल्हेंकडून अजित पवारांच्या जाहीरनाम्याची खिल्ली

## प्रिंटिंग मिस्टेकमुळे चंद्र आणून देण्याचे आश्वासन द्यायचे राहिले

**मुंबई (वृत्तसंस्था)**–अजित पवार यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यामध्ये राज्यातील जनतेला विविध योजनांचे आश्वास देण्यात आले आहे. मात्र, शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी अजित पवारांच्या जाहीरनाम्याची खिल्ली उडवली आहे. आता फक्त चंद्र आणून देतो, एवढेच आश्वासन जाहीरनाम्यात द्यायचे राहिले आहे. प्रिंट मिस्टेकमुळे अजित दादांकडून तेवढा वादा राहिल्याची मिष्किली टिप्पणी अमोल कोल्हे यांनी केली.



अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ५० मतदारसंघासाठी ५० स्वतंत्र जाहीरनामे जाहीर केले आहेत. त्यामध्ये शेतकरी कर्जमाफीच्या आश्वासनासह लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढवणार असल्याचे सांगितले आहे. दरम्यान, राज्यावर साडे आठ लाख कोटींचे कर्ज असतानाही जाहीरनाम्यातून इतके सारे करण्याचे आश्वासन दिले जाते आहे, असे म्हणत अमोल कोल्हेंनी अजित पवारांच्या जाहीरनाम्यावर अनेक प्रश्न उपस्थित केले. जाहीरनाम्यात कदाचित प्रिंटिंग मिस्टेक झाली आहे. त्यात आम्ही तुम्हाला चंद्र आणून देऊ ही एक ओळ छापायची राहून गेली. महाराष्ट्र राज्यावर तब्बल साडेआठ लाख कोटींचे कर्ज असताना अडीच वर्षात असंविधानिक आणि पक्ष फोडून सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. हे त्यांनी कशासाठी केले?, असा प्रश्न निर्माण होतो.पक्ष फोडून, चिन्ह पळवून, पक्षाच नाव घेऊन जे काही मिळालं. त्यांनी साध्य काय केलं. लोकसभेत मतदान कमी पडल्याने लाडकी बहीण योजना काढली. दोन-अडीच महिन्यात अनेक योजनांचा निधी ठराविक योजनेकडे वळवला. इतर सर्व योजना वाऱ्यावर सोडल्या, अशी टीका अमोल कोल्हे यांनी केली.अमोल कोल्हे यांनी महागाईवरूनही सरकावर निशाणा साधला. भाव स्थिर ठेवण्याचे आश्वासन या सरकारने दिले. पण, गेल्या दोन वर्षात दहा जीवनावश्यक वस्तूंचे भाव या सरकारने स्थिर ठेवले आहेत का? याचे उत्तर सरकारने द्यावे. दिवाळीचा किराणा भरताना खिशाला किती खार लागला, हे प्रत्येकाला कळलेले आहे आणि त्यामुळे महायुतीचे आश्वासन हे केवळ पोकळ हवा आहे. आता सत्तेत येणार नाही हे माहित आहे असल्यामुळे वाटेल ती आश्वासने जाहीरनाम्यातून दिली जात आहे, असा अमोल कोल्हेंनी महायुती सरकाला लगावला आहे.

## लाडक्या बहिणींना २१०० रुपये,तर पीएम किसानचे १५ हजार करणार

### महायुतीचा जाहीरनामा प्रसिद्ध, शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन

**कोल्हापूर (वृत्तसंस्था)**

महायुतीने आज कोल्हापुरातून प्रचाराचा नारळ फोडला आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीचा दहा कलमी जाहीरनामा देखील सादर केला आहे. यावेळी बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, या सभेने महाराष्ट्रातल्या इतिहासातील नवा अध्याय लिहिला जाणार आहे. १९९५ मध्ये युतीचा प्रचाराचा पहिला नारळ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी कोल्हापूरमध्ये फोडला, आई आंबाबाईच्या आशीर्वादाने. २०१४ साली देखील प्रचाराचा श्रीगणेशा इथूनच झाला आणि इतिहास घडला. २०२४ साली देखील याच करवीरनगरीमधून प्रचाराची सुरुवात होत आहे.



महायुती जाहीरनामामधील १० कलम

१. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे जाहीर करत आहोत. महिला सुरक्षेसाठी २५००० हजार महिलांना पोलिस दलात भरती करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.

२. शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्राच्या तिजोरीवर पहिला हक्क शेतकऱ्याचा आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर करत आहोत तसेच शेतकरी सन्मान योजना जी आहे पंतप्रधानांची त्याचे ६००० आणि आपले ६०००, एकूण १२ हजार जी आहे, ती १२ हजार वर्षाला १५ हजार करण्याचा निर्णय घेतला आहे. एमएसपीवर २० टक्के अनुदान देण्याचा देखील निर्णय घेण्यात आला आहे

३. या राज्यात कोणीही उपाशी झोपणार नाही. प्रत्येकाला अन्न आणि निवारा देण्याचे वचन आम्ही देत आहोत.

४. वृद्ध पेन्शनदार कामना योजना १५०० वरून २१०० रुपये देण्याचे वचन आम्ही देत आहोत.

५. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

६. २५ लाख रोजगार निर्मिती, १० लाख विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

७. ४५ हजार गावात पांदण रस्ते बांधणार

८. अंगणवाडी आणि आशा सेविकांना १५ हजार रुपये आणि विमा सुरक्षाकवच देण्याचा निर्णय घेतला आहे.

९. वीजबिलात ३० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात सौर आणि अक्षय उर्जेवर भर देणार आहोत.

१०. व्हीजन महाराष्ट्र २०२९ हे १०० दिवसांच्या आत सादर करण्याचे वचन या १० कलमी कार्यक्रमात आहे.

दरम्यान, यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी देखील महाविकास आघाडीवर तसेच उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, कोल्हापूर उत्तरेतून पंजा गायब आणि पश्चिमेतून देखील करायचा आहे. महाराष्ट्राची सेवा करण्यासाठी पुन्हा आशीर्वाद मिळू दे. कोल्हापुरातून सुरुवात केली की विजय मिळतोच मिळतो. उद्धव ठाकरे या ठिकाणी आले होते. ते म्हणाले की महाराजांचा इंग्रजांवर राग होता म्हणून सुरत लुटली. तुम्हाला आता औरंगजेबाचं नाव घ्यायला लाज वाटू लागली. हिंदुहृदयसम्राट नाव बाळासाहेबांच्या नावापुढचे काढून टाकले, अशी खोचक टीका फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर केली आहे.

## विकासद्रोही,राज्यद्रोही,धर्मद्रोही,जनताद्रोही महाविकास आघाडीच्या नेत्यांना धडा शिकवा-भाजपा गटनेते आ.दरेकर

### काँग्रेसचा लाळघोटेपणा करणाऱ्या ठाकरेंवर रोज आरोपपत्र दाखल करणार

**ठाणे । प्रतिनिधी**

विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर पहिले पाऊल टाकणाऱ्या महाराष्ट्राला तब्बल दहा वर्षे मागे नेऊन विकासाची वाट रोखणारे महाविकास आघाडी सरकार व नाकर्ते मुख्यमंत्री म्हणून इतिहासात नोंद झालेले उद्धव ठाकरे यांना त्यांची जागा दाखवून देण्यासाठी भाजपाने जंग पुकारला असून महाराष्ट्रद्रोही, विकासद्रोही, शेतकरीविरोधी, महिला व युवकविरोधी, बाळासाहेबांचे हिंदुत्व खुंटीवर टांगून काँग्रेसचा लाळघोटेपणा करणारे धर्मद्रोही ठाकरे यांच्यावर प्रदेश भाजपातर्फे दररोज आरोपपत्र दाखल करण्यात येणार आहे, असे भाजपाचे विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी आज पत्रकार परिषदेत जाहीर केले.

भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकर यांची आज ठाणे येथे पत्रकार परिषद पार पडली. यावेळी ते बोलत होते. या पत्रकार परिषदेला भाजपा आमदार निरंजन डावखरे, ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष संजय वाघेला, महिला जिल्हा अध्यक्षा मृणाल पेंडसे, मीडिया सेंटरचे सागर भदे यांसह पदाधिकारी उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत संबोधित करताना आ. प्रविण दरेकर म्हणाले कि, स्वतःचे कोणतेच कर्तृत्व नसणारे, निवडणूकदेखील लढवू न शकणारे उद्धव ठाकरे आपण आग्रह केल्यामुळे मुख्यमंत्री झाले, असा थेट आरोप शरद पवार यांनी केला होता. स्वतः उद्धव ठाकरे यांनीही, बाळासाहेबांचा पुत्र नसतो, तर मला काडीचीही किंमत नाही असे सांगून तशी कबुलीच दिली होती. मुख्यमंत्रीपदासाठी हपापलेल्या ठाकरे यांनी शिवसैनिकास मुख्यमंत्री करण्याऐवजी स्वतःच पदावर बसले आणि आपल्या कृतीचे समर्थन करण्याकरिता शाब्दिक कसरती सुरू केल्या. महाराष्ट्राच्या सुदैवाने त्यांच्या नेतृत्वाखालील भ्रष्ट आघाडीचा सत्ताकाळ अडीच वर्षातच आटोपला अन्यथा महाराष्ट्र लयास गेला असता. सत्तेवर येताच विकासाचे प्रकल्प बंद करणारा पहिला मुख्यमंत्री असेच ठाकरे यांचे वर्णन करावे लागेल. या सत्ताकाळात राज्याच्या हिताचे एखादे तरी दखल घेण्याजोगे काम केल्याचे उद्धव ठाकरे यांनी दाखवून द्यावे, असे आव्हानही यावेळी दरेकरांनी दिले.

दरेकर पुढे म्हणाले कि, मुस्लिम लांगूलचालनासाठी वक्फ बोर्ड कायद्याच्या विरोधात दंड थोपटत ज्यांनी आपल्या वडिलांच्या हिंदुत्वाला तिलांजली देऊन दिवाळी साजरी करण्यासही विरोध केला, ते उद्धव ठाकरे महाराष्ट्राच्या जनतेशी कसे प्रामाणिक राहणार? उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारने महाराष्ट्राचा विकास रोखला, महामार्ग बांधणे थांबविले, मेट्रो रेल्वेच्या कामास स्थगिती दिली, महाराष्ट्रातील उद्योगांचा मार्ग रोखला, करोना काळात आर्थिक पॅकेज देण्याची घोषणा करूनही संकटग्रस्त जनतेच्या तोंडाला पाने पुसली, कोविड काळात बॉडी बॅग, खिचडी, कोविड सेंटर, औषध खरेदी कंत्राट अशा अनेक घोटाळ्यांना संरक्षण दिले. अशा प्रत्येक घोटाळ्याचा पंचनामा आगामी काळात करण्यात येणार असून अशा भ्रष्ट नेत्यांना राजकारणातून हद्दपार करण्याच्या महाराष्ट्राच्या जनतेने घेतलेल्या निर्णयास समर्थन देण्यासाठी ठाकरेविरोधी महासंग्रामाचे रणशिंग फुंकण्याचा भाजपचा निर्धार असल्याचे दरेकरांनी यावेळी जाहीर केले.



दरेकर पुढे म्हणाले कि, महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर असताना राज्याच्या प्रगतीला खीळ बसली आणि सर्वच क्षेत्रांत राज्याची पीछेहाट झाली. मुंबईतील आरे-कुलाबा मेट्रो प्रकल्पाचे काम निम्म्याहून अधिक पूर्ण झालेले असताना हा प्रकल्प थांबविल्यामुळे मविआ सरकारने राज्याचे १४ हजार कोटींचे नुकसान केल्याचे स्पष्ट झाले, अन्य अनेक जनहिताचे प्रकल्प रोखल्याने शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि गरीब जनता सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहिली. मुंबईचा किनारी मार्ग, अटल सेतू, मेट्रो, नवा विमानतळ, झोपडपट्टी योजना, अशा अनेक सुविधा महायुती सरकारने पुढे राबविल्या आणि बिघडलेला महाराष्ट्राचा मार्ग रुळावर आणला. अडीच वर्षांत उद्धव ठाकरे यांच्या सरकारने केलेल्या जनहिताच्या आणि राज्यहिताच्या एका तरी कामाचा दाखला द्यावा. ठाकरे सरकारने प्रकल्प रोखले, आणि महायुती सरकारने त्यांना गती दिली.दरेकर म्हणाले कि, सरकारने ठरविले, तर विकासाचे शानदार उपक्रम सरकार राबवू शकते, हे महायुती सरकारने सिद्ध केले आहे. विकासासोबत समाजजीवनाचा स्तर उंचावण्याच्या योजनाही राबविण्याची गरज ओळखून लाडकी बहीण योजना राज्यात सुरू केली, ज्येष्ठ नागरिक, महिला, शेतकरी अशा अनेक घटकांसाठी महायुती सरकारने आखलेल्या योजनांमुळे राज्याच्या सामाजिक विकासालाही गती मिळाली आहे. पटोले-पवार-ठाकरे यांच्या महाविकास आघाडीने आपल्या सत्ताकाळात अनेक घोषणा केल्या, अनेक आश्वासने दिली. पण त्यापैकी एकही आश्वासन पूर्ण केले नाही, एकही घोषणा अमलात आणली नाही. त्यांच्याच सत्ताकाळात एसटी कर्मचाऱ्यांची परवड झाली, वेतनही न मिळाल्याने १२० कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्या, एमपीएससी परीक्षार्थींच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून त्यांना वाऱ्यावर सोडले. याउलट महायुती सरकारने गेल्या सव्वादोन वर्षांत केलेल्या कामांचा लेखाजोखा प्रगती पुस्तकाद्वारे महाराष्ट्रासमोर मांडला असून सामाजिक, औद्योगिक विकास व पायाभूत सुविधांमुळे राज्याचा बदललेला चेहरामोहरा जनतेसमोर आहे. विधानसभेसाठी महाराष्ट्रात होऊ घातलेली आगामी निवडणूक ही महाराष्ट्राच्या भविष्याची वाटचाल निश्चित करण्यासाठी निर्णायक ठरणार असून राज्याच्या विकासाला स्थगिती देणारे सरकार हवे की प्रगतीला गती देणारे सरकार सत्तेवर हवे याचा निर्णय मतदारांना करायचा आहे. गेल्या पाच वर्षांतील पहिल्या अडीच वर्षांत जनतेने स्थगितीचा अनुभव घेतला व अलीकडच्या अडीच वर्षांत वेगवान प्रगतीचाही अनुभव घेतला. त्यामुळे निर्णय करणे आता सोपे झाले असून महायुतीला कौल देऊन जनता प्रगतीच्या बाजूने मतदान करेल, असा विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला.

# मुल येथे डॉक्टर अभिलाषा गावतुरे यांच्या प्रचार रॅलीत शक्ती प्रदर्शन, जनतेचा प्रचंड प्रतिसाद

**मुल । प्रतिनिधी**

मुल येथे बल्लारपूर ७२ विधानसभेतील अपक्ष उमेदवार डॉक्टर अभिलाषा गावतुरे यांच्या प्रचार रॅलीत हजारोंच्या संख्येने नागरिकांचा सहभाग दिसून आला. बहुजन आणि जनसामान्यांचे अधिकृत उमेदवार म्हणून उभ्या राहिलेल्या अभिलाषा ताईंना जनतेचा मोठा पाठिंबा मिळत असून त्यांच्या नेतृत्वाचा प्रभाव मतदारसंघात स्पष्टपणे जाणवत आहे.

गेल्या पंधरा वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैद्यकीय आणि राजकीय क्षेत्रात सतत कार्यरत असलेल्या अभिलाषा ताईंनी मतदारसंघातील विविध प्रश्नांना हाताळले आहे. भूमिपुत्र ब्रिगेडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, वाचनालये, अभ्यासिका सुरू केल्या असून, बससेवा, शिक्षकांची नियुक्ती अशा समस्यांवर त्यांनी ठोस भूमिका घेतली आहे. नवेगाव मोरे येथे शिक्षकांच्या कमतरतेचा प्रश्न मार्गी लावला, तर मामल्यातील विद्यार्थ्यांसाठी बस उपलब्ध करून दिली.

शेतकऱ्यांचे पीक विमा, नुकसान भरपाई आणि वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेत अभिलाषा यांनी मोठी आंदोलने उभी केली. तसेच, पाणीपुरवठा विभागाच्या मजुरांच्या शोषणाविरोधातही त्यांनी आवाज उठवला. वैद्यकीय सेवा पुरवण्यासाठी अतिदुर्गम भागांत जाऊन आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली.

महाराष्ट्रातील पहिल्या ओबीसी जनगणनेसाठी निघालेल्या ओबीसी मोर्चाचे नेतृत्वही अभिलाषा आणि डॉक्टर राकेश गावतुरे यांनी केले. आदिवासी





समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांनी भक्कम भूमिका घेतली, ज्यामुळे मतदारसंघात त्यांचा चाहता वर्ग वाढत चालला आहे. मुल येथे झालेल्या त्यांच्या प्रचार रॅलीने प्रतिस्पर्धी उमेदवारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण केले आहे

## मलकापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांचे हाल, मार्केट बंद ठेवल्यास हायवे रोकोचा इशारा

**मलकापूर । प्रतिनिधी**

मलकापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत आज शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. हरी ओम ट्रेडर्सकडून काही रक्कम पोलिसांनी जप्त केल्याने सकाळी ६ वाजल्यापासूनच शेतकऱ्यांची अडचण झाली आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांचा माल विक्रीसाठी अडकून पडला असून बाजार समितीतील कामकाज ठप्प झाले आहे.




दिवाळीनंतर बाजाराला सुट्टी असल्याने मागील दोन दिवसांपासून मार्केटमध्ये मालाची मोठी गर्दी झाली आहे. मात्र, पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे शेतकऱ्यांना आता अधिक प्रतीक्षा करावी लागत आहे. इलेक्शनचा पैसा पकडा, शेतकऱ्यांचा नाही, अशी भूमिका शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. बाजार सुरू न झाल्यास शेतकऱ्यांनी हायवे बंद करण्याचा इशारा दिला आहे.

या परिस्थितीत प्रशासनाने योग्य तोडगा काढावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. कोणी तरी न्याय देईल का? या आशेवर उभे असलेले शेतकरी आपल्या मालाच्या विक्रीसाठी मार्ग मोकळा होण्याची वाट पाहत आहेत.

## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई,२ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा । प्रतिनिधी**

२०२४ विधानसभा निवडणुकीसाठी आदर्श आचार संहितेच्या कार्यान्वयनानंतर वर्धा जिल्ह्यात अवैध दारू निर्मिती, विक्री आणि वाहतुकीविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई केली आहे. १० ऑक्टोबर २०२४ ते ४ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत जिल्ह्यातील चारही विधानसभा क्षेत्रांमध्ये ही कारवाई करण्यात आली.या कारवाईत राज्य उत्पादन शुल्क विभागाने २१ गुन्हे नोंदवले असून, १८ आरोपींना अटक केली आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये १,८९० लिटर मोहा रसायन, २८.२६ लिटर देशी मद्य, २.२ लिटर विदेशी मद्य, ९.४२ लिटर परराज्यातील मद्य, २४७ लिटर गावठी दारू



आणि १ दुचाकी वाहन समाविष्ट आहे. याबद्दलची एकूण किंमत २,२७,६०४ रुपये आहे.विधानसभा निवडणुकीच्या शांततेत पार पडण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाचे निरीक्षक एम.ए. शेख यांनी याबाबत माहिती दिली.

अवैध मद्य विक्री व वाहतुकीला कडक दंड आणि जागरूकतेसाठी अशा कारवाया सुरू राहणार असून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांचे महत्त्व वाढले आहे.

## प्रसिद्ध उद्योजक आणि माजी नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती यांच्या घरावर आयकर विभागाची धाड

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर: वैजापूर तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक आणि माजी नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती, ज्यांना 'वैजापूरचे कुबेर' म्हणून ओळखले जाते, यांच्या घरावर आयकर विभागाने ६ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेसहा वाजता छापेमारी केली. या कारवाईत संचेती यांचे निकटवर्तीय विक्रम सुराणा यांच्या घरावरही धाड टाकण्यात आली. सुराणा हे संचेती यांच्या बहिणीचे चिरंजीव असून, वैजापूर को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत.

दिवाळी सणानंतर सुरु झालेल्या महायुती आणि महाविकास आघाडीच्या प्रचार मोहिमेमध्ये या छाप्यांमुळे खळबळ उडाली आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे





उमेदवार डॉ. दिनेश भाऊ परदेशी यांचे निकटवर्तीय म्हणून संचेती यांची ओळख आहे. त्यामुळे या छापेमारीमागे राजकीय हेतू असल्याची चर्चा वैजापूरमध्ये रंगत आहे.

यापूर्वीही, उद्धव ठाकरे गटात परदेशी यांचा प्रवेश होत असताना त्यांना आयकर विभागाच्या कारवाईची धमकी मिळाल्याचे सांगितले जात होते. पक्षप्रवेश नंतर, परदेशी यांनी मातोश्री येथे पक्षप्रवेश केला होता.

आता संचेती यांच्यावर झालेल्या कारवाईने राजकीय चर्चेला नवीन वळण लागले असून, यामागे राजकीय दबाव असू शकतो, अशी चर्चा वैजापूर तालुक्यात सुरू आहे.

## आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत
# सोयाबीनची ऑनलाईन नोंदणी व खरेदी सुरू

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समिती चंद्रपूर व दि. महाराष्ट्र स्टेट का-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि.मुंबई तर्फे जिल्हा मार्केटिंग अधिकारी चंद्रपूर यांचे संयुक्त विद्यमाने, हंगाम २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाच्या नाफेड/ एन.सी.सी.एफ मार्फत आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत, सोयाबीन शेतमाल खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी कृषी उत्पन्न बाजार समिती चंद्रपूर येथे सुरू आहे.

सोयाबीन नोंदणी करीता १) शेतीचा चालू वर्षाचा खरीप सोयाबीन पिकपेरा नोंद असलेला ई-७/१२ व नमुना ८ अ, २) बँक पासबुक ३) आधारकार्ड ४) मोबाईल क्रमांक या आवश्यक कागदपत्रांसह सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांनी, स्वत: कार्यालयात हजर राहून कृषी उत्पन्न बाजार समिती, चंद्रपूर येथे नोंदणी करून घ्यावी व शासकीय हमीभाव योजनेचा लाभ घ्यावा.

तसेच बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्यांना पाणपोई, पिण्यासाठी पाणी, शेतमाल मोजण्यासाठी वेट ब्रिज काटा व ईलेक्ट्रानिक्स वजनकाटे, सी.सी.टिव्ही कॅमेरे इ. सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर येताना सोयाबीन शेतमाल व्यवस्थितरित्या साफ करून, वाळवून आणावा, जेणेकरून आद्रता मोजतांना १२ टक्क्यांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. बाजार समितीचा एस.एम.एस. आल्यानंतर शेतकरी बांधवांनी आपला सोयाबीन शेतमाल केंद्रावर विक्रीसाठी आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अहिल्यानगर : भाजप पदाधिकाऱ्यांनी सचोटीने उमेदवार संग्राम जगतापांच्या प्रचारात उतरावे – अभय आगरकर

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राज्यातील महायुतीच्या पार्श्वभूमीवर नगर शहर भाजपाने त्यांच्या उमेदवार आ. संग्राम जगताप यांच्या विजयासाठी एकजुटीने प्रचारात सक्रिय होण्याचा निर्णय घेतला आहे. मंगळवारी झालेल्या बैठकीत भाजप शहराध्यक्ष अभय आगरकर यांनी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना विधानसभा निवडणुकीत निस्वार्थ, निरपेक्षपणे, सचोटी व प्रामाणिकपणे काम करण्याचे आवाहन केले. आगरकर यांनी स्पष्ट केले की, भाजपचे ध्येयधोरणे आणि महायुतीचे घटक पक्षांबरोबर केलेले निर्णय मान्य करुन ही निवडणूक लढवली जात आहे.

आ. संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत ज्येष्ठ नेते सुनील रामदासी, निवडणूक प्रमुख महेंद्र गंधे, माजी




जिल्हाध्यक्ष प्रा. भानुदास बेरड, जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. भाजपच्या समर्थनाबद्दल आ. संग्राम जगताप यांनी आभार व्यक्त करताना सांगितले की, या निवडणुकीत भाजपचा मोठा वाटा असेल आणि नागरिकांनी अपप्रचारावर विश्वास न ठेवता महायुतीला पुन्हा सत्ता मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे.

यावेळी प्रास्ताविक सरचिटणीस सचिन पारखी यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रशांत मुथा व महेश नामदे यांनी केले.

## गंगापूर : अपक्ष उमेदवार डॉ. सुरेश सोनवणे यांच्या प्रचार रॅलीला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**गंगापूर । प्रतिनिधी**

खुलताबाद विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात होताच अपक्ष उमेदवार डॉ. सुरेश सोनवणे यांच्या प्रचार रॅलीला तरुणांसह विविध वयोगटातील मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. गंगापूर तालुक्यातील जामगाव, गळलिंब, कायगाव, शिंदेवाडी, कणकोरी, दिघी, तुर्काबाद या गावांमध्ये झालेल्या जनसंवाद दौऱ्यादरम्यान डॉ. सोनवणे यांना मतदारांनी उत्स्फूर्त समर्थन दिले आहे.

प्रस्थापित उमेदवार भाजपचे प्रशांत बंब आणि सतीश चव्हाण यांच्या विरोधात उतरलेल्या डॉ. सोनवणे यांनी गावोगावी प्रचार दौरा करत मतदारांच्या समस्या ऐकून घेतल्या. या जनसंवाद दौर्यात तरुण, महिला, आणि



वयोवृद्धांनी आपल्या भागातील समस्यांवर समाधानकारक बदलाची मागणी केली. मतदारांनी आश्वासन नको, बदल हवा अशा अपेक्षेने आपले समर्थन दर्शवले.

डॉ. सुरेश सोनवणे यांनी जनतेला आश्वस्त करताना सांगितले की, मी आपला भूमिपुत्र असून मतदारसंघातील प्रत्येक घटकाचा विकास, शाश्वत विकास व समस्यांचे समाधान हेच माझे ध्येय आहे. प्रस्थापितांविरुद्ध ही भूमिपुत्राची लढाई असून, आपल्या मतदान रूपी आशीर्वादाने मला सेवा करण्याची संधी द्या. या प्रसंगी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# पुलगाव रेल्वे स्थानकाला विभागीय रेल्वे अधिकारी राजेंद्र अग्रवाल यांची अचानक भेट

## रेल्वे आधुनिकीकरण आणि नवीन रेल्वे कार्यालय बांधणीच्या कामाचा आढावा घेतला

**पुलगाव । प्रतिनिधी**

नागपूर रेल्वेचे विभागीय अधिकारी राजेंद्र अग्रवाल हे आज ६ नोव्हेंबर रोजी अचानक पुलगाव येथे आले व त्यांनी संपूर्ण रेल्वे स्थानकाला भेट देऊन सुमारे १ तास स्मार्ट रेल्वे स्थानकाच्या बांधकामाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिल्या. आज अचानक दिलेल्या भेटीची पुर्वकल्पना दिली असती तर स्थानिक पत्रकार किंवा




रेल्वे सल्लागार समिती उपस्थित राहिले असते किंवा निमंत्रित केले असते तर पुलगाव रेल्वे स्थानकावर प्रवाशांना होत असलेल्या अडचणींबाबत राजेंद्र अग्रवाल यांना निवेदन दिले असते व मागणी करण्यात आली असती. पुलगाव रेल्वे स्थानकावर कोरोना काळात बंद करण्यात आलेल्या हावडा अहमदाबाद एक्सप्रेसचा स्टॉप पुन्हा सुरू करण्याची मागणी अनेक दिवसांपासून असलेली मागणी मांडता आली असती. त्यावर सकारात्मकतेने चर्चा झाली असती . कदाचित रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी या अचानक भेटीमुळे या विषयावर गांभीर्य दाखवू इच्छित नाहीत.

## एकनाथ जाधव यांची भाजपमधून हकालपट्टी; महायुतीत असंतोषाची चर्चा

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यात राजकीय हालचालींना जोर आला असून, काही कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश होत असताना काही कार्यकर्त्यांना पक्षातून बाहेर केले जात आहे.

याच पार्श्वभूमीवर भाजपचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष एकनाथराव जाधव यांना पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे.



महायुतीचे अधिकृत उमेदवार रमेश पाटील बोरनारे असतानाही जाधव यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज मागे न घेतल्याने आणि महायुतीत बंडखोरी केल्यामुळे पक्षाने त्यांच्यावर कारवाई केली आहे. या निर्णयामुळे वैजापूरमधील भाजप कार्यकर्त्यांमध्ये असंतोष पसरला आहे.

या घटनेमुळे महायुतीचे उमेदवार रमेश पाटील बोरनारे यांना मतांचा फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, याचा थेट लाभ उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उमेदवार दिनेश भाऊ परदेशी यांना होईल, अशी चर्चा सध्या वैजापूरमधील जनतेमध्ये सुरू आहे.

# प्रवक्ते पद गेलं तरी चालेल..-नितेश कराळे मास्तरांचा घराणेशाहीवर टीका,पक्षावर संताप

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्ध्याचे नितेश कराळे मास्तर यांनी आपल्याच पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसवर घराणेशाहीचा गंभीर आरोप केला आहे. आर्वी आणि वर्धा मतदारसंघासाठी उमेदवारी मिळवण्यासाठी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडे मागणी केली होती. त्यासाठी त्यांनी इच्छुक उमेदवारीसाठी आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या होत्या. तथापि, ऐनवेळी वर्धा मतदारसंघ काँग्रेसला दिला गेला, तर आर्वी मतदारसंघ मयुरा अमर काळे यांना देण्यात आला. या निर्णयामुळे नाराज झालेल्या कराळे मास्तरांनी पक्षाच्या घराणेशाहीवर टीका केली आहे. कराळे मास्तर यांनी सांगितले की, पक्षाने एकाच घरात खासदार आणि आमदार दोन्ही उमेदवारी कशा दिल्या? सामान्य कार्यकर्त्यांना महत्त्व दिलं पाहिजे, त्यांच्या मतांना जागा मिळालं पाहिजे. त्यांनी घराणेशाहीवर टीका करत असं स्पष्ट केलं की, जो कुठला पण पक्ष घराणेशाही करेल, त्याला माझा विरोध असेलच.नितेश कराळे मास्तरांनी एका पत्रकार परिषदेत आपला संताप व्यक्त केला. त्यांनी सांगितलं की, आर्वी मतदारसंघावर माझा दावा होता, मात्र खासदार अमर काळे यांच्या पत्नीसाठी मतदारसंघ राखण्यात आला. यामुळे लोकांमध्ये नाराजी आहे. मी यावर शरद पवारांशी बोलणार आहे.त्यांनी पक्षातील निर्णयांवर नाराजी व्यक्त करत, आता मी भाषणं देण्यासाठी शुल्क घेईन. महाविकास आघाडीच्या नेत्यांना याबाबत मी स्पष्ट सांगितले आहे, अशी प्रतिक्रिया दिली.नितेश कराळे मास्तरांचा हा घोष निश्चितच पक्षात खळबळ माजवणारा ठरला आहे. घराणेशाहीविरोधात आपला आवाज उठवणारे कराळे मास्तर आगामी काळात या मुद्द्यावर आणखी सक्रिय होण्याची शक्यता आहे.



# 'माझी लढत देवेंद्र फडणवीस यांच्याशीच' खासदार अमर काळे यांचा खुलासा

**वर्धा । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज परत घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आर्वी मतदारसंघात भाजप उमेदवारीवरून राजकीय चर्चांना उधाण आले आहे. काँग्रेसच्या गोटात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले असून, खासदार अमर काळे यांच्यावर आपल्या पत्नी मयुरा काळे यांच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून उमेदवारी खेचून आणल्याचा आरोप झाला आहे.



या आरोपांवर खासदार अमर काळे यांनी एका स्थानिक वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत खुलासा करताना सांगितले, माझ्या पत्नीने उमेदवारीसाठी अर्ज केलेला नव्हता. पक्षानेच मयुरा काळे यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे माझी लढत आंतरिक गटाशी नसून देवेंद्र फडणवीस यांच्याशी आहे. तसेच मी नेहमीच उपलब्ध असतो, निवडणुकीनंतर भेटीगाठीचे नियोजन निश्चित करून करीन, असेही त्यांनी स्पष्ट केले.

घराणेशाहीच्या आरोपावर उत्तर देताना खासदार काळे म्हणाले, प्रत्येक पक्षात घराणेशाही आढळते, त्यात काय चूक आहे? मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही घराणेशाहीचा आरोप केला जातो. परंतु, येथे मुख्य मुद्दा असा आहे की, आमची लढत फडणवीस यांच्याशी आहे.

भाजपचे उमेदवार वानखेडे यांना फडणवीस यांच्या प्रभावातून विकासकामे मार्गी लावण्याचे यश मिळाले आहे, त्यामुळे त्यांना 'यूएसपी' म्हणून ओळखले जात आहे. लोकांच्या कामांची प्रगती होत असेल, तर त्यात काही चूक नाही, असे मत भाजप नेत्यांनी व्यक्त केले आहे.

विशेष म्हणजे, अमर काळे यांच्या वक्तव्यामुळे आर्वी मतदारसंघात तणाव निर्माण होण्याची शक्यता असल्याचे काही राजकीय निरीक्षकांचे मत आहे. फडणवीस विरुद्ध पवार असा संघर्ष रंगताना दिसत असून, या निवडणुकीत खरा रंग कोणता, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# बल्लारपूर मतदारसंघातील उमेदवारांची;खर्च लेखा तपासणी ७, ११ व १७ नोव्हेंबर रोजी

## उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने ७२ - बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणा-या सर्व उमेदवारांची निवडणूक खर्च लेखा तपासणी ७, ११ व १७ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात येणार आहे. सदर खर्च तपासणी वेळी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील कलम ७७ मधील तरतुदीनुसार निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी त्यांच्या निवडणूक खर्चाचे अभिलेखे उपलब्ध करून देणे अपरिहार्य आहे. त्यानुसार बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात प्रथम खर्च लेखा तपासणी गुरुवार दि. ७ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत, द्वितीय खर्च लेखा तपासणी सोमवार, दि. ११ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत तर तृतीय खर्च लेखा तपासणी रविवार दि. १७ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत उपविभागीय अधिकारी कार्यालय, मूल येथे करण्यात येईल.


७५ - बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक खर्च निरीक्षक आदित्य बी. हे वरील दिनांकास व वेळेस उपविभागीय अधिकारी कार्यालय, मूल येथे खर्च तपासणीकरीता उपलब्ध राहणार आहे. जे उमेदवार खर्चाचे लेखे तपासणीकरीता सादर करणार नाही, त्यांच्यावर निवडणूक आयोगामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे बल्लारपूरचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अजय चरडे यांनी कळविले आहे.

# मुंबईतील ५८ पोलीस निरीक्षकांच्या नियुक्त्या अखेर पूर्ण; विविध ठाण्यांमध्ये पदस्थापना

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईबाहेरून नियुक्तीसाठी प्रतीक्षेत असलेल्या ५८ पोलीस निरीक्षकांच्या पोस्टिंगचे आदेश अखेर सोमवारी रात्री जाहीर करण्यात आले. या नियुक्त्यांच्या आदेशामुळे विविध पोलीस ठाण्यांमध्ये रिक्त पदांची भरती होत असून, निवडणूक काळात पोलिसांच्या प्रभावी उपस्थितीसाठी ही कारवाई महत्त्वपूर्ण ठरली आहे. संबंधित अधिकार्यांना तत्काळ त्यांच्या नवीन ठिकाणी रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुंबईसह इतर शहरांत मोठ्या प्रमाणावर पोलीस अधिकार्यांच्या बदल्या झाल्या. यात मुंबईतील अनेक पोलीस ठाण्यांमधील निरीक्षकांच्या



बदल्या केल्या गेल्यामुळे निवडणुकीच्या तयारीत अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे काही पोलीस अधिकारी न्यायासाठी मॅटकडे गेले होते, परंतु त्यांना दिलासा मिळाला नाही, परिणामी सर्व अधिकारी बदल्यांच्या ठिकाणी रुजू झाले.

आदेशानुसार, मिरा-भाईंदर-वसई-विरार येथील रमेश भामे यांची अंधेरी पोलीस ठाण्यात, शैलेंद्र नगरकर यांची मालवणी, जयराम रनवरे यांची कस्तुरबा मार्ग, सदाशिव निकम यांची आंबोली, राहुल सोनावणे यांची विलेपार्ले येथे नियुक्ती करण्यात आली आहे. विविध पोलीस ठाण्यांमध्ये यासारख्या अनेक अधिकारी रुजू होत आहेत, ज्यामुळे येत्या निवडणुकीच्या काळात कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती सुरळीत ठेवण्यास मदत होणार आहे.

ही निर्णयप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, मुंबईतील पोलीस दलात सुस्थिती येण्याची शक्यता वर्तवली जात आहे

# घरगुती जेवणाच्या मेसच्या नावाखाली देह विक्रीचा गोरखधंदा;नागरिकांनी केला भांडाफोड

**अकोला । प्रशांत कुंडकर**

अकोल्यातील मोठी उमरी भागात घरगुती खानावळच्या नावाखाली देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची खळबळजनक बाब उघडकीस आली आहे. याप्रकरणी स्थानिक नागरिकांनी देहविक्रीचा व्यवसाय चालवणाऱ्या दोन महिलांसह चार पुरुषांना घरात बंदिस्त केले, त्यानंतर पोलिसांना बोलावून हा प्रकार उघड केला.

सिव्हिल लाईन पोलीस घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी दोन महिलांसह चार पुरुष ग्राहकांना ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रति ग्राहक २ हजार रुपये आकारून हा व्यवसाय सुरू होता. उच्चभ्रू वस्तीत घरगुती जेवणाच्या मेसच्या आड



हा गोरखधंदा सुरू असल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

घटनास्थळी सुमारे दीड ते दोन तास नागरिकांनी मोठा गोंधळ घातला होता. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर नागरिकांचा संताप शांत झाला. सिव्हिल लाईन पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

# लाडजळगाव हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न-२१ वर्षांनंतर जुन्या आठवणींना दिला उजाळा

**बोधेगाव । सुधीर जावळे**

लाडजळगाव हायस्कूलच्या २००२-०३ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा तब्बल २१ वर्षांनंतर उत्साहात संपन्न झाला. शाळेच्या माजी व विद्यमान विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत एकमेकांशी संवाद साधला. या वेळी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक अंकुश पोटभरे, ढेसले , कणसे, मडके , बाबासाहेब देशमुख, तसेच शाळेचे इतर शिक्षक आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाचे अध्यक्षपद मुख्याध्यापक कांबळे यांनी भूषवले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. कै. मारूतराव घुले व डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमांचे पूजन व स्व. वैद्य , स्व. जावळे , आणि स्व. राजेंद्र तहकीक यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमात माजी शिक्षकांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सर्व माजी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्पाने स्वागत करण्यात आले. यावेळी सर्वांनी आपले परिचय देत जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थिनींना भाऊबीज भेट म्हणून साडी व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

मनोगत सत्रात घुले , बाबासाहेब देशमुख व माजी मुख्याध्यापक अंकुश पोटभरे यांनी आपले अनुभव व आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी २००२-०३ बॅचच्या विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली होती. नियोजन व पूर्व तयारीसाठी अतुल मारकंडे, बप्पासाहेब कणसे, विकास राठोड, सुरेश कणसे, संदीप मुळक, दत्तात्रय क्षिरसागर, शरद गोर्डे, गहिनीनाथ ढाकणे, गणेश झांबरे, भरत ढाकणे व अर्चना घुले-हिंगे यांनी विशेष योगदान दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरद गोर्डे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गहिनीनाथ ढाकणे यांनी केले. सर्वांच्या सहकार्याने हा स्नेहमेळावा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला.

# वरोरा मतदारसंघातील उमेदवारांची खर्च लेखा तपासणी ८, १२ व १८ नोव्हेंबर रोजी

## उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने ७५ - वरोरा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणा-या सर्व उमेदवारांची निवडणूक खर्च लेखा तपासणी ८, १२ व १८ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात येणार आहे. सदर खर्च तपासणी वेळी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील कलम ७७ मधील तरतुदीनुसार निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी त्यांच्या निवडणूक खर्चाचे अभिलेखे उपलब्ध करून देणे अपरिहार्य आहे. त्यानुसार प्रथम खर्च लेखा तपासणी शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं ५ वाजेपर्यंत, द्वितीय खर्च लेखा तपासणी मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत तर तृतीय खर्च लेखा तपासणी सोमवार दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत उपकोषागार अधिकारी कार्यालय, वरोरा येथे करण्यात येईल.

७५- वरोरा विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक खर्च निरीक्षक धर्मेंद्र सिंग हे वरील दिनांकास व वेळेस उपकोषागार अधिकारी कार्यालय, वरोरा येथे खर्च तपासणीकरीता उपलब्ध राहणार आहे. जे उमेदवार खर्चाचे लेखे तपासणीकरीता सादर करणार नाही, त्यांच्यावर निवडणूक आयोगामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे वरोराचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी दोन्तुला जेनित चंद्रा यांनी कळविले आहे.

# 'आरंभ है प्रचंड'-हर्षदा काकडे यांच्या प्रचाराचा शुभारंभ, स्वयंभू निद्रिस्त गणपतीच्या आशीर्वादाने आश्वासक पर्वाची सुरुवात

**बोधेगाव । सुधीर जावळे**

शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार हर्षदा काकडे यांनी ५ नोव्हेंबर रोजी स्वयंभू निद्रिस्त गणपती देवस्थान, आव्हाने बु. येथे गणपतीचे आशीर्वाद घेत आणि १०१ नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ केला. या वेळी शिवसेना (उबाठा) नेते सचिन घायाळ, जगन्नाथ गावडे, रामनाथ महाराज शास्त्री, रमेश महाराज राठोड, आणि अनेक प्रमुख मान्यवर उपस्थित होते.



यावेळी हर्षदा काकडे यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, मी कर्तृत्ववान ॲड. शिवाजीराव काकडे यांची पत्नी आणि कॉ. आबासाहेबांची सून आहे. मी जनतेच्या प्रश्नांसाठी काम करणारी उमेदवार आहे. वीज, पाणी, रस्ते, सार्वजनिक संकुले आणि तरुणांसाठी रोजगाराच्या संधी आणण्याचा माझा वचननामा आहे.

काकडे यांनी प्रस्थापित साखर कारखानदारांवर टीका करत, त्यांना पराभूत करण्याचे आवाहन केले. त्यांनी आपल्या ऑटो रिक्षा चिन्हास मतदारांनी मतदान करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि शिवसेना नेते सचिन घायाळ यांनी प्रस्थापित नेत्यांवर ताशेरे ओढत, सर्वसामान्यांच्या हितासाठी हर्षदा ताईंना विजयी करणे आवश्यक आहे, असे सांगितले.

कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला आणि आरंभ है प्रचंड अशा घोषणांनी परिसर दुमदुमला.

# वैजापूरचे एकनाथ जाधव आणि गंगापूरचे डॉ.सुरेश सोनवणे यांची भाजपमधून हकालपट्टी

**गंगापूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाने बंडखोरी करणाऱ्या नेत्यांवर कडक कारवाई करत वैजापूरचे एकनाथ जाधव आणि गंगापूरचे डॉ. सुरेश सोनवणे यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. भाजपच्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

विधानसभा निवडणुकीत काही ठिकाणी भाजपने विद्यमान आमदारांना पुन्हा संधी दिली असली तरी काहींना नव्या चेहऱ्यांना तिकीट देण्यात आले होते. मात्र, काही इच्छुकांनी पक्षाच्या निर्णयाला न मानता उमेदवारी अर्ज मागे घेण्यास नकार दिला. त्यामुळे पक्षाच्या अडचणी वाढल्याने भाजपने कडक पावले उचलली आहेत.



एकनाथ जाधव यांचा वैजापूर मतदारसंघात मजबूत जनाधार असल्याने त्यांनी पक्षाच्या आदेशाचे पालन न करता स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी कार्यकर्त्यांच्या बैठका घेत निवडणुकीसाठी सज्ज असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे विद्यमान आमदार रमेश बोरणारे यांच्यावर या बंडखोरीचा काय परिणाम होईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

तसेच गंगापूरमधील गरुड झेप अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश सोनवणे यांनीही बंडखोरी करत विधानसभेसाठी अर्ज दाखल केला. विद्यमान आमदार प्रशांत बंब यांना भाजपने पुन्हा तिकीट दिल्यामुळे नाराज झालेल्या सोनवणे यांनी अर्ज मागे न घेण्याचा निर्णय घेतला. पक्षशिस्त आणि अनुशासन भंग केल्याच्या कारणावरून भाजपने जाधव व सोनवणे यांना पक्षातून हकालपट्टी केली आहे.

भाजपच्या या निर्णयामुळे आगामी विधानसभा निवडणुकांवर परिणाम होण्याची शक्यता असून बंडखोरांना स्थानिक पातळीवर जनतेचा कितपत पाठिंबा मिळतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# आघाडीस धक्का 'आप'चा दोन ठिकाणी आघाडीला, तर दोन ठिकाणी अपक्षांना पाठिंबा

**वर्धा । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत इंडिया अलायन्ससोबत कार्य करून अमर काळे यांच्या विजयास हातभार लावणाऱ्या आम आदमी पार्टीने या विधानसभा निवडणुकीत आपले उमेदवारनिहाय भूमिका घेतली आहे. आघाडीस पाठिंबा देण्याच्या संदर्भात आप मध्येच फूट पडण्याची चिन्हे असताना, पक्षाने काही ठिकाणी आघाडीला, तर काही ठिकाणी अपक्ष उमेदवारांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

वर्धा विधानसभा मतदारसंघात आघाडीचे उमेदवार शेखर शेंडे यांच्या ऐवजी अपक्ष उमेदवार डॉ. सचिन पावडे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय आज घेतला गेला. तसेच, आर्वी आणि हिंगणघाट येथे आघाडीचे उमेदवार मयुरा काळे आणि अतुल वांदिले यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. देवळी मतदारसंघात अपक्ष उमेदवार किरण ठाकरे यांना पाठिंबा देण्यात आला आहे, तर आघाडीचे रणजीत कांबळे यांना पाठिंबा देण्याचे टाळले गेले.

काँग्रेसचे शेखर शेंडे यांनी 'आप' संघटनेस पाठिंबा देण्याची विनंती केली होती, मात्र त्यावरून पक्षात फूट पडण्याचे चिन्हे दिसून आले. काही कार्यकर्त्यांनी शेंडे यांना पाठिंबा दिला, तर काहींनी डॉ. पावडे यांना समर्थन दिले. शेवटी पक्षाने समजून आणि सर्वांच्या सहमतीने पावडे यांचे समर्थन करण्याचा निर्णय घेतला. 'आप' पक्षाने या निर्णयावर प्रतिक्रिया देताना आरोप केला की, राजकीय शक्तींच्या दबावामुळे पक्षात फूट पाडण्याचे प्रयत्न केले जात आहेत. आपचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत दोड यांनी या निर्णयाचे स्पष्टीकरण देताना सांगितले, डॉ. पावडे हे सुसंस्कृत, शिक्षित आणि भ्रष्टाचारापासून दूर असलेले नेते आहेत. ते धर्मनिरपेक्ष विचारधारेच्या आधारावर सामाजिक चळवळी चालवितात. वर्धा व हिंगणघाट मतदारसंघात आमच्या कार्यकर्त्यांची सभा देखील आयोजित केली जात आहे.

लोकसभा निवडणुकीत 'आप' पक्षाने केलेले कार्य आघाडीच्या विजयासाठी पूरक ठरले होते, असे खासदारांनीही मान्य केले आहे. त्यावेळी 'इंडिया अलायन्स'च्या एकजुटीचे महत्त्व लक्षात घेतले होते. तथापि, विधानसभा निवडणुकीत त्याच एकजुटीचा अभाव दिसून येत आहे.दोड यांनी सांगितले की, आमच्या निर्णयाबाबत वरिष्ठ नेत्यांना माहिती देण्यात आली आहे आणि केंद्रीय संघटनेने काही गाईडलाईन्स घालून दिल्या होत्या. त्याच चौकटीत राहून हा निर्णय घेतला आहे. लोकसभा निवडणुकीत सर्व भाजप विरोधक एकजूट होऊन आघाडीसोबत उभे राहिले होते, तर विधानसभा निवडणुकीत वेगवेगळा पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला गेला आहे. आता, आगामी विधानसभा निवडणुकीत 'आप'चा निर्णय कसा परिणामकारक ठरतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.



# आदिवासी उमेदवारांकरीता नि:शुल्क स्पर्धा परिक्षा पूर्व प्रशिक्षण

## २६ नोव्हेंबर पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आदिवासी उमेदवारांकरीता वर्ग-३ व वर्ग-४ पदांकरीता घेतल्या जाणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेची तयारी करून घेण्याकरीता आदिवासी उमेदवारांकरीता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, चंद्रपूर येथे स्पर्धा परिक्षा पूर्व प्रशिक्षण दिनांक १ डिसेंबर २०२४ ते १५ मार्च, २०२५ पर्यंत राबविण्यात येणार आहे. प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांना दरमहा १ हजार रुपये विद्यावेतन देय राहील. या प्रशिक्षण कालावधीत खालील अटीची पुर्तता करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या एसटी प्रवर्गातील आदिवासी उमेदवारांनी त्यांचे अर्ज २६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत सादर करावेत.

अर्जामध्ये स्वत:चे पूर्ण नाव, संपूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक, जन्मतारीख, शैक्षणिक पात्रता, प्रवर्ग (जात), जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद, चंद्रपूर यांचा नोंदणी क्रमांक इत्यादी बाबींचा उल्लेख करावा व सोबत आवश्यक कागदपत्रे जोडावीत. अर्ज करण्यांकरीता (Employment Card) असणे आवश्यक आहे. उमेदवारांनी आपले अर्ज जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद, प्रशासकीय भवन, पहिला माळा, हॉल क्र.१९, चंद्रपूर येथे २६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत सादर करावे. तसेच मुळ कागदपत्रासह २७ नोव्हेंब रोजी सकाळी ११ वाजता वरील स्थळी मुलाखतीकरीता उपस्थित राहावे. निवड यादी दुसऱ्या दिवशी सायंकाळपर्यंत प्रसिध्द करण्यात येईल.

प्रशिक्षणाच्या अटी : १) उमेदवार अनु.जमाती एसटी (आदिवासी ) प्रवर्गातील असावा. २) उमेदवाराचे किमान वय १८ ते ३८ चे दरम्यान असावे. ३) उमेदवार किमान एच.एच.एस.सी परीक्षा उत्तीर्ण असावा. ४) उमेदवारांचे नांव जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद, चंद्रपूर येथे नोंदणी केलेली असावे. आवश्यक कागदपत्रे : १) शाळा सोडल्याचा दाखला. २) जातीचा दाखला किंवा जात वैधता प्रमाणपत्र. ३) मार्कशिट्स एसएसीसी/ एचएचएससी/पदवी ४) आधार कार्ड. ५) जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद, चंद्रपूर या कार्यालयाचे नोंदणी कार्ड.

# निवृत्तीवेतन धारकांनी ३० नोव्हेंबरपूर्वी हयात असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

निवृत्ती वेतनधारकांची दिनांक १ नोव्हेंबर २०२४ रोजी हयात असल्याच्या प्रमाणपत्राची (Life Certificate) यादी संबंधीत बँकेसह पाठविण्यात येणार असून त्यावर आपल्या नावासमोरील रकान्यात निवृत्ती वेतनधारकांनी ३० नोव्हेंबर २०२४ पुर्वी स्वत: उपस्थित राहून सदर यादीवर मोबाईल क्रमांक, पॅन क्रमांक, आधार क्रमांक नमुद करून स्वाक्षरी करावयाची आहे. जेणेकरून हयात असल्याचे प्रमाणपत्राची यादी कोषागाराला वेळीच प्राप्त होईल व त्यांचे माहे डिसेंबर २०२४ पासूनचे निवृत्तीवेतन बँकेकडे वेळीच पाठविता येईल.

तसेच जे निवृत्तीवेतनधारक मनिऑर्डरद्वारे निवृत्ती वेतन घेतात, त्यांनी आपले हयात प्रमाणपत्र राजपत्रित अधिकाऱ्यांकडून प्रमाणित करून ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत कोषागाराला पाठवावे. खालीलपैकी कोणत्याही एका मार्गाने आपण हयातीचा दाखला सादर करु शकता. आपले पेन्शन खाते असलेल्या बँकेच्या शाखेत जाऊन बँक अधिकाऱ्याच्या समक्ष हयात दाखल्याच्या यादीतील आपल्या नावासमोर स्वाक्षरी करा. बँकेत जाऊ शकत नसल्यास जीवनप्रमाण या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पद्धतीने पुढीलप्रमाणे हयात दाखला सादर करा. १) https://jeevanpraman.gov.inया संकेतस्थळावर लॉगइन करा. २) ऋएछएठ-ऊ डखऋए उएठढखऋखउ-ढए वर क्लीक करा. ३) तुमचा आधार क्रमांक टाका. ४) तुमच्या मोबाईल नंबरवर आलेला ओटीपी टाका आणि तुमचा हयातीचा दाखला काही सेंकदात प्राप्त करा. ५) तुमच्या जवळच्या जिल्हा कोषागार कार्यालय किंवा उपकोषागाराला भेट द्या. ६) हयात दाखल्यावर बँक अधिकारी किंवा राजपत्रीत अधिकाऱ्याच्या समक्ष स्वाक्षरी करुन जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करा. ७) काही कारणानिमित्त परदेशात असल्यास तेथील भारतीय राजदुतामार्फत हयातीचा दाखला संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करा.

हयात प्रमाणपत्र ५ डिसेंबर २०२४ पर्यंत कोषागारास प्राप्त न झाल्यास त्यांचे माहे डिसेंबर २०२४ पासूनचे निवृत्तीवेतन बॅकेकडे पाठविले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी, असे जिल्हा कोषागार अधिकारी सुहास पवार यांनी कळविले आहे.

# चंद्रपूर मतदारसंघातील उमेदवारांची खर्च लेखा तपासणी ९,१३ व १९ नोव्हेंबर रोजी

## उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने ७१ - चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणा-या सर्व उमेदवारांची निवडणूक खर्च लेखा तपासणी ९, १३ व १९ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात येणार आहे. सदर खर्च तपासणी वेळी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील कलम ७७ मधील तरतुदीनुसार निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी त्यांच्या निवडणूक खर्चाचे अभिलेखे उपलब्ध करून देणे अपरिहार्य आहे. त्यानुसार चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात प्रथम खर्च लेखा तपासणी शनिवर दि. ९ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत, द्वितीय खर्च लेखा तपासणी बुधवार, दि. १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत तर तृतीय खर्च लेखा तपासणी मंगळवार दि. १९ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत जिल्हा कोषागार कार्यालय, दुसरा माळा, चंद्रपूर येथे करण्यात येईल.

७१ - चंद्रपूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक खर्च निरीक्षक आदित्य बी. हे वरील दिनांकास व वेळेस जिल्हा कोषागार कार्यालय, चंद्रपूर येथे खर्च तपासणीकरीता उपलब्ध राहणार आहे. जे उमेदवार खर्चाचे लेखे तपासणीकरीता सादर करणार नाही, त्यांच्यावर निवडणूक आयोगामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे चंद्रपूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संजय पवार यांनी कळविले आहे.

# लिंगायत गवळी समाजाचे 'सगर महोत्सव' सम्पन्न

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड दीपावली निमित्त परंपरानुसार दरवर्षी प्रमाणे लिंगायत गवळी समाजाच्या वतीने सगर महोत्सव समारंभ आज दि.०२/११/२०२४ ला 'यदुकुल' वजीराबाद हनुमान मंदिर नांदेड येथे अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. हजारों यादव गवळी, लिंगायत गवळी, श्रीकृष्ण गवळी समाज बांधव सहभागी झाले होते.परंपरानुसार चौधरी गोकुल बिशनकुमार यादव यांच्या हस्ते सगरची पूजा करून सगर सुरू झाले.





या कार्यक्रमात उत्कृष्ट पशु प्रदर्शन व पशुसंवर्धन करीता लिंगायत गवळी समाज बांधवा चे यथोचित सत्कार ही करण्यात आला. या प्रसंगी यादव अहीर मंडळाचे संस्थापक स्व.चौधरी शामलाल यादव ट्राफी, गोल्ड मेडल व सन्मान-पत्र देऊन सर्वांना सन्मानित करण्यात आले.

सदरील कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र यादव युवक महासभाचे प्रदेश सचिव व सामाजिक कार्यकर्ते चौधरी गोकुल बिशनकुमार यादव यांनी केले होते.

या कार्यक्रमास आमदार श्री.मोहनअण्णा हंबर्डे, शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.आनंद पाटील बोंढारकर,श्री.डोईफोडेजी, आदि ने सदिच्छा भेट दिली.

या कार्यक्रम प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतवर्षीय यादव महासभाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बिशनकुमार यादव, माजी नगरसेवक किशोर यादव, माजी नगरसेवक धीरज यादव उपस्थित होते. कार्यक्रमात भारतभूषण यादव, गगन यादव, गोपाल यादव, डॉ.कैलाश यादव, प्रभू आप्पा आलमखाने, धोंडीबा परनकार, धोंडीबा कनबाले, नरसू आप्पा आलमखाने, चंद्रकांत जुजाराव, नंदकिशोर लुले, शिवाजी ओसेकर, महेश अष्टेकर, सदाशिव आलमखाने, शिवाजी आलमखाने, गोविंद आलमखाने, बालाजी चौधरी, चंद्रभान बटाऊवाले, संजय यादव, सतीश यादव,राजेश कुलकर्णी, विजय यादव, अजय यादव, स्वराज यादव, ऋषी यादव, मन्नू यादव, देवांश यादव व समाजाचे अनेक गण मान्यवर सहभागी होते.

# भंडारा पवनी विधानसभा मतदार संघात विकासाच्या नावावर जनतेचा विश्वासघात ;नरेंद्र पहाडे यांचे सत्ताधाऱ्यांवर घणाघाती टीकेचे आव्हान

## नवे उद्योग न आणणाऱ्यांना आणि जनतेचे आर्थिक शोषण करणाऱ्यांना सत्तेतून खाली खेचण्याचे आवाहन

**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा पवनी विधानसभा मतदार संघातून सर्वसामान्य जनतेचा लोकप्रिय उमेदवार नरेंद्र पहाडे यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकले असून गावागावात प्रचार करून सुजाण मतदार बांधव तसेच विविध समाजाच्या सामाजिक संघटनांच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी प्रत्यक्ष भेटून संवाद साधून मतदान रुपी आशीर्वाद मागत आहेत.

नरेंद्र पहाडे यांनी आपल्या प्रचारसभेत सत्ताधाऱ्यांवर घणाघाती टीका केली. त्यांनी म्हटले की, भंडारा पवनी विधानसभा मतदार संघातील जनतेने ज्यांना निवडून दिले, त्यांनी १० वर्षात पवनी आणि भंडारा तालुक्यात एकही नवीन उद्योग स्थापन केला नाही. पवनी तालुक्यातील एमआयडीसी उद्योगाविना रखडलेली असून बेरोजगार तरुण वणवण भटकत आहेत, त्यांना रोजगार मिळत नाही.

शेतकऱ्यांच्या शेतमालाला खर्चावर हमी भाव मिळत नसल्याने शेती संकटात आहे. तसेच गोसे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या सुटत नाहीत, असे नरेंद्र पहाडे यांनी आरोप केले.महायुतीच्या सत्ताधाऱ्यांवर टीका करताना त्यांनी म्हणले की, महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पाठवले जात आहेत आणि राज्यातील शेतकऱ्यांना त्याचे नुकसान होऊनही लोकप्रतिनिधी गप्प बसले आहेत.

याशिवाय, नरेंद्र पहाडे यांनी भंडारा पवनी विधानसभा मतदार संघातील उद्योगांची दुरवस्था आणि बेरोजगारीच्या वाढत्या समस्येवर गंभीर चिंता व्यक्त केली. नवे उद्योग स्थापन करणे हेच विकासाचे खरे प्रमाण आहे, मात्र याकडे कोणतीही लक्ष देणारी सरकार व लोकप्रतिनिधी नाहीत, असे ते म्हणाले.

शेतकऱ्यांना महागाई आणि आर्थिक संकटांचा सामना करावा लागत असल्याने, त्यांच्या बचतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेचे विश्वासघात करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना सत्तेतून खाली खेचण्याचे आवाहन त्यांनी केले.नरेंद्र पहाडे यांचा प्रचार गावागावातून शेतकरी, शेतमजूर, कामगार, भूमीहीन आणि गोरगरीब नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यामुळे त्यांचा विश्वास आणि लोकप्रियता वाढत आहे, असे यावेळी स्पष्ट झाले.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .